महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे Rs.2/- कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ ०८ मे २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३०९ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**प्रतिनिधी हवे आहेत**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी प्रतिनिधी नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईंदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव म्हसा धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'

मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)

संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१




# 'हा नवा भारत आहे !
## हल्ले सहन करणार नाही - मुख्यमंत्री

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भारतीय हवाई दलाने मध्यरात्री एअर स्ट्राईक करत पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला चोख प्रत्युत्तर दिले. पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू-काश्मीरच्या हद्दीत एअर स्ट्राईक करून नऊ दहशतवादी तळ उद्ध्वस्त करण्यात आले. या कारवाईनंतर संबंध देशभरातून समाधान व्यक्त केले जात आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या कारवाईवर आनंद व्यक्त केला असून भारतीय सैन्यदल आणि पंतप्रधान मोदींचे अभिनंदन व्यक्त केले आहे. "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आधीच सांगितलं होतं की पहलगामच्या घटनेचं प्रत्युत्तर दिलं जाईल. आम्ही अशा प्रकारची घटना सहन करणार नाही, असं मोदींनी स्पष्ट सांगितलं होतं. त्यानंतर अतिशय सबळ अशा प्रकारचं उत्तर भारतीय लष्कराने दिलं आहे. दहशतवाद्यांचे अड्डे नष्ट करण्यात आले आहे. दहशतवादाच्या विरोधातील लढाई भारताने केली आहे. हा नवीन भारत आहे. हा नवा भारत अशा प्रकारचे हल्ले सहन करणार नाही. हे भारताने दाखवून दिलं", असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

"गेल्या १३ ते १४ दिवसांत जगातील अनेक देशांबरोबर संपर्क करून पहलगामच्या घटनेत पाकिस्तान कसा दोषी आहे? याचे पुरावे भारताने दिले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह, राजनाथ सिंह यांनी विविध देशांबरोबर चर्चा करून पाकिस्तानने कशा प्रकारे हल्ला केला हे जगाला देखील सांगितलं आहे. त्यामुळेच आज संपूर्ण जग भारताबरोबर आहे. आपण जर पाहिलं तर पाकिस्तानच्या उत्तरेपासून ते दक्षिणेपर्यंत सगळीकडील दहशतवाद्यांचे अड्डे नष्ट करण्याचं काम भारतीय लष्कराने केलं आहे", असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

**"भारतीय हवाई दलाने एअर स्ट्राईक करत दहशतवाद्यांचे नऊ अड्डे उध्वस्त केले आहेत. या कारवाईचे संपूर्ण शुटिंग करण्यात आले असल्यामुळे यावेळी कुणाला पुरावा मागण्याकरिता जागाच उरली नाही. मला असे वाटते की, सर्व भारतीयांकरिता अभिमानाचा असा हा दिवस आहे. आमच्यावर झालेला हल्ला भारत सहन करणार नाही. भारत योग्य पद्धतीने बदला घेईल, हे आपण दाखवून दिले आहे. ऑपरेशन सिंदूर हे नाव अधिक बोलके आहे, असे मला वाटते."**

○ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




# रस्त्यांनी घेतला मोकळा श्वास
## अंबरनाथ शहरातील रस्त्यांवरील अतिक्रमणे भुईसपाट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथः** अंबरनाथ शहराच्या प्रमुख रस्त्यांवर रस्ते अडवणाऱ्या अतिक्रमणांवर बुधवारी अंबरनाथ नगरपालिका प्रशासनाने धडक कारवाई केली. अंबरनाथ पूर्व आणि पश्चिम भागातील अग्नीशमन दल मुख्यालय ते कोहोजगांव चौक, बी. केबीन रस्ता ते मोरीवली पाडा आणि मटका चौक ते फॉरेस्ट नाका या तीन प्रमुख रस्त्यावरील अतिक्रमण, अनधिकृत बांधकाम व हातगाड्या

**शहरातील सर्व नागरीकांना आणि व्यापारी वर्गाला आवाहन करण्यात येते की शहरातील मुख्य रस्त्यावर, पदपथावर अतिक्रमण करु नये. जेणेकरुन नागरीकांना येण्याजाण्यास अडथळा निर्माण होणार नाही. अन्यथा कडक कारवाई करण्यात येईल. रस्ते, पदपथ मोकळे ठेवण्यासाठी पालिका प्रशासनाला सहकार्य करावे.**


○ उमाकांत गायकवाड,
मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपालिका.

तसेचच पदपथावर असलेले अतिक्रमणे अंबरनाथ नगरपालिकेने हटवले. अनेक महिन्यांपासून ही कारवाई करण्याची मागणी नारिकांकडून केली जात होती.

गेल्या काही दिवसांपासून अंबरनाथ शहरात अतिक्रमणांनी डोके वर काढले होते. शहरातील सर्वच महत्वाच्या रस्त्यांवर दररोज अतिक्रमणे वाढत असल्याचे चित्र होते. शहरातील महत्वाचे आणि वर्दळीचे चौक फेरिवाल्यांच्या विळख्यात अडकल्याचे दिसत होते. त्याचा परिणाम रस्ते वाहतुकीवरही होत होता.

त्यामुळे या अतिक्रमणांवर कारवाई करण्याची मागणी केली जात होती. अंबरनाथ शहरातली कल्याण बदलापूर रस्त्यावर मटका चौक, विमको नाका, फॉरेस्ट नाका या चौकांमध्य हातगाड्या, खाद्यपदार्थ विक्रेते यांनी बस्तान मांडले होते.

# आयुक्त अभिनव गोयल यांची रुक्मिणीबाई रुग्णालयास अचानक भेट
## रुग्णांच्या चेअर वर बसून रुग्णांशी थेट संवाद





दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

**महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी दिनांक ०७ मे २०२५ रोजी सकाळी ९.१५ वाजता कल्याण येथील रुक्मिणीबाई रुग्णालयाला अचानक भेट दिली. रुग्णालयातील रुग्णालयांच्या चेअर वर बसून रुग्णांशी थेट संवाद साधत त्यांनी मिळणाऱ्या सेवा, औषधसाठा आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीचा आढावा घेतला. दौऱ्यात आयुक्तांच्या निदर्शनास आले की, ओपीडीची ठरलेल्या वेळेत सुरु झालेली नव्हती. याबाबत त्यांनी कडक नाराजी व्यक्त करत खालील स्पष्ट निर्देश दिले.**

**आयुक्तांचे निर्देशः**

1. ओपीडी वेळापत्रक आयुक्तांच्या मंजुरीनंतर प्रसिद्ध करावे.
2. सर्व डॉक्टरांनी विहीत वेळेच्या किमान ५ मिनिटे अगोदर ओपीडीमध्ये उपस्थित राहावे.
3. डॉक्टर अनुपस्थित असल्याचे दिसून आले. याबाबत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश.

**इतर महत्त्वाचे निर्देशः**

- सर्व डॉक्टर, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वेतन बायोमेट्रिक हजेरीनुसार अदा करावे.
- फार्मासिस्ट अनुपस्थित होता; याबाबत चौकशी करून अहवाल सादर करावा.
- औषध साठ्यावर संगणक प्रणालीद्वारे नियंत्रण ठेवावे, औषधे उपलब्ध नसल्यास जबाबदारी निश्चित करावी.
- फार्मासिस्ट अनुभवी नसल्याची बाब निदर्शनास; नागरिकांना योग्य सेवा मिळावी म्हणून अनुभवी कर्मचारी नियुक्त करावेत.

**शिस्त, पारदर्शकता आणि दर्जेदार रुग्णसेवा हीच प्राथमिकता असली पाहिजे. अशा शब्दांत महापालिका आयुक्तांनी रुग्णालय व्यवस्थापनाला बजावले. सेवा, शिस्त आणि उत्तरदायित्वावर भर कसा देता येईल यावर काम करण्याच्या सूचना पालिका आयुक्तांनी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपा शुक्ल यांना दिल्या आहेत.**

- डॉक्टर/कर्मचारी वेळेत उपस्थित राहण्यासाठी आदेश निर्गमित करावेत; अचानक तपासणी करून अहवाल सादर करावा.
- स्त्रीरोग तज्ज्ञांची ओपीडी सेवा त्वरित सुरु करावी.
- प्रसूती सेवा सुरु करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.
- सुविधा अधिक दर्जेदार व्हाव्यात.
- रुग्णांशी सौजन्यपूर्ण वर्तन करावे.
- रुग्णालय बाहेरील कचरा व बॅनर तत्काळ हटवावे.
- रुग्णवाहिका दुरुस्त करून देखभाल नियमित करावी. वाहनचालक सेवा टाळल्यास कारवाईचे प्रस्ताव सादर करावेत.

# अवकाळी पावसामुळे ठाणे जिल्ह्यातील आंबा व भाजीपाला पिकाची नासाडी

### भिवंडीत सर्वाधिक नुकसान
***
### कृषी विभागाकडून पंचनामे सुरु

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - जिल्ह्यातील सुमारे सर्वच तालुक्यांमध्ये मंगळवारी रात्री अचानक झालेल्या पावसामुळे जिल्ह्यातील सुमारे २४ हेक्टरवरील आंबा बागांचे नुकसान झाले आहे. यामध्ये काही ठिकाणी झाडे उन्मळून पडली आहे तरी काही ठिकाणी काढणीसाठी आलेली फळे गाळून पडली आहेत. यामध्ये अधिक नुकसान भिवंडी तालुक्यातील शेतकऱ्यांचे झाले आहे. याबाबत कृषी विभागाकडून नुकसानीचे पंचनामे सुरु करण्यात आले आहे. मे महिन्याच्या तीव्र उन्हाचा तडाखा सोसत असताना मंगळवारी रात्री अचानक जिल्ह्यात सर्वत्र वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने हजेरी लावली. यामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. तर अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यामुळे वीज देखील खंडित झाल्याने शहरी तसेच ग्रामीण भागात अंधारात राहावे लागले. जिल्ह्यात पावसासह वादळी वाऱ्याचे प्रमाण अधिक असल्याने विविध ठिकाणी आंबा पिकाचे चांगलेच नुकसान झाले आहे. आंब्याच्या हंगाम सुरु झाल्यानंतर एप्रिल आणि मे महिन्यात कोकणातून येणाऱ्या हापूस आणि इतर आंब्याची जास्त विक्री होते. तर मे महिन्याच्या मध्यानंतर ठाणे जिल्ह्यातील मुरबाड, शहापूर आणि भिवंडी तालुक्यात मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतल्या जाणाऱ्या आंबे बाजारात दाखल होत असतात. याच पद्धतीने आता येत्या आठवड्यापासून येथील आंबे बाजारात दाखल होणार आहेत. मात्र यापूर्वी जिल्ह्यातील सुमारे ८० शेतकऱ्यांना या पावसाचा फटका बसला आहे. मंगळवारी रात्री झालेल्या या पावसामुळे भिवंडी, मुरबाड आणि शहापूर तालुक्यात पावसामुळे आंबा पिकाचे खूप मोठे नुकसान झाले. तर भिवंडी मध्ये ३३ टक्क्यांहून अधिक नुकसान झाले असून या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी कृषी विभागाकडून पंचनामे करण्याची सुरुवात करण्यात आली आहे.





# कल्याणमध्ये 'मॉक ड्रिल'यशस्वी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** केंद्रीय गृह विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आपत्कालीन परिस्थितींसाठी सज्जता तपासण्यासाठी "ऑपरेशन अभ्यास" या मॉक ड्रिलचे आयोजन कल्याण पश्चिमेतील यशवंतराव चव्हाण क्रीडांगणावर करण्यात आले होते. केंद्रीय गृह विभागाने दिलेल्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे पालन करून यशस्वीरित्या ही मॉक ड्रिल पार पडली.


यावेळी कल्याण आणि आजूबाजूच्या परिसरातील एकूण 4 सायरन एकाच वेळी वाजले. बॉम्ब हल्ल्याची सूचना मिळाली. सर्व नागरिकांना सुरक्षित ठिकाणी पोहोचण्यासाठीच्या सूचना देण्यात आल्या. धावाधाव, गडबड न करता नागरिकांना सुरक्षित ठिकाणी पोहोचविले. या परिसरात शोध मोहीम घेवून जखमी, अडकलेल्या नागरिकांची तात्काळ सुटका करणे, त्यांना प्रथमोपचार करणे, ही कार्यवाही करण्यात आली. यावेळी जिल्हा प्रशासन, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कल्याण तहसिलदार, नागरी संरक्षण दल, केडीएमसी आयुक्त, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, पोलीस यंत्रणांचे अधिकारी आणि आमदार तसेच राजकीय पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.



यावेळी सर्वसामान्य नागरिकांनी हे मॉकड्रील पाहण्यासाठी गर्दी केली होती. तर हे मॉकड्रील सुरु असतांना अचानक आलेल्या पावसाने सगळ्यांची चांगलीच धांदल उडाली. पावसापासून बचावासाठी अनेकांनी ग्राउंडबाहेर जात दुकानांच्या आडोशाचा आधार घेतला. तर काहींनी चक्क मैदानातील स्टेजखाली जात आपला बचाव केला.



# भारताचे चोख प्रतिउत्तर...




२२ एप्रिल रोजी पहलगाम येथे पाक पुरस्कृत दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला या भ्याड हल्ल्यानंतर संपूर्ण भारतात संतापाची लाट उसळली. दहशतवाद्यांनी केलेला हा भ्याड हल्ला पर्यटकांवर नव्हता तर भारताच्या सार्वभौमत्वावर होता त्यामुळे भारत पाकिस्तानच्या या भ्याड हल्ल्यास कधी चोख प्रतिउत्तर देणार ? असा प्रश्न विचारला जात होता. याचे उत्तर बुधवारी मिळाले. बुधवार ७ मे रोजी मध्यरात्री १ वाजून २८ मिनिटांनी भारतीय वायू दलाने पाकव्याप्त काश्मीरवर हवाई हल्ले केले. भारतीय हवाई दलाने केलेल्या या हल्ल्यात पाकव्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादी तळावर हल्ले करून दहशतवाद्यांचे कंबरडे मोडले. भारतीय हवाई दलाने केलेल्या या हल्ल्यात शेकडो दहशतवादी ठार झाले आहेत. भारताने केलेल्या या हल्ल्यात किती दहशतवादी ठार झाले याचा आकडा समोर आला नसला तरी या हल्ल्यात १०० पेक्षा अधिक दहशतवादी ठार झाल्याची शक्यता असून यात लष्कर ए तोयबा आणि जैश ए मोहम्मदचे अनेक मोठे दहशतवादी ठार झाले आहेत. भारतीय हवाई दलाने जवळपास २३ मिनिटे हल्ले केले. भारताने केलेल्या हवाई हल्ल्याला ऑपरेशन सिन्दुर असे नाव देण्यात आले. पहलगाम येथे झालेल्या भ्याड हल्ल्यात ज्या भारतीय महिलांचे कुंकू ( सिन्दुर ) पुसले गेले त्या महिलांच्या सन्मानार्थ या मोहिमेला लष्कराने ऑपरेशन सिन्दुर असे नाव दिले. ऑपरेशन सिन्दुर यशस्वी करून भारतीय सैन्याने पहलगाम येथे मरण पावलेल्या २६ पर्यटकांच्या हत्येचा बदला घेतला आहे. भारतीय सैन्याची ही कामगिरी अभिमानास्पद आहे. पाकिस्तानला जशास तसे उत्तर देणाऱ्या भारतीय सैन्याच्या या गौरवपूर्ण कामगिरीने १५० कोटी भारतीयांची मान अभिमानाने उंचावली आहे. भारतीय सैन्याच्या या कामगिरीचा देशवासीयांना सार्थ अभिमान असून १५० कोटी भारतीय भारतीय सैन्यदलापुढे नतमस्तक आहे. जो भारताकडे तिरक्या नजरेने पाहिल त्याला भारत घरात घुसून मारेल असा इशाराच भारताने जगाला दिला आहे. भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणाऱ्यांची गय केली जाणार नाही. ॲक्शनला रीॲक्शन मिळणारच. हा भारत २०२५ चा भारत आहे हे भारताने पाकिस्तानला पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. ही मोहीम यशस्वी करून भारतीय सैन्यदलाने आपले सामर्थ्य जगाला दाखवून दिले आहे. अर्थात भारताने पाकव्याप्त काश्मीरवर केलेला हा पहिला हवाई हल्ला नाही. या आधी २०१६ आणि २०१९ साली भारताने असाच हवाई हल्ला करून पाकिस्तानला इशारा दिला होता. मात्र दोनदा हवाई हल्ले झाल्यानंतर देखील पाकिस्तानची खोड मोडली नाही पाकिस्तानने दहशतवाद्यांना आर्थिक आणि लष्करी मदत करणे चालूच ठेवले त्याचे परिणाम पाकिस्तानला भोगावे लागले. आता तरी पाकिस्तानने शहाणे व्हावे व दहशतवाद्यांना केली जाणारी लष्करी व आर्थिक मदत थांबवावी नाही तर भारत यापेक्षाही मोठी कारवाई करेल. १९७१ साली भारताने पाकिस्तानचे दोन तुकडे केले जर पाकिस्तानने आपली खोड मोडली नाही तर भविष्यात पाकिस्तानचे चार तुकडे होतील. भारताने पाकव्याप्त काश्मीरवर केलेल्या या हवाई हल्ल्याला पाकिस्तान कसे उत्तर देईल हे पाहावे लागेल. अर्थात या हवाई हल्ल्याला पाकिस्तानने प्रतिउत्तर दिले तर ती पाकिस्तानची सर्वात मोठी चूक ठरेल जर पाकिस्तानने तसे केले तर भारत - पाकिस्तान युद्धाला तोंडच फुटेल. भारत पाकिस्तान युद्धाला तोंड फुटले तर पाकिस्तान जगाच्या नकाशावरून गायब होऊ शकतो याचे भान पाकिस्तानने ठेवावे. पाकिस्तानने चीनच्या भरवश्यावर भारताशी दोन हात करू नयेत कारण आजचा भारत हा चीनलाही जशास तसे उत्तर देण्यास सक्षम आहे. चीननेही पाकिस्तानची बाजू लावून धरू नये कारण दहशतवादाविरुद्धच्या या युद्धात भारताला अनेक देशांची साथ आहे. अमेरिका, इस्राईल, जपान, रशिया या देशांनी आताच भारताला पूर्ण पाठिंबा दिला आहे. पाकिस्तानला जरी तुर्कस्तान, मलेशिया आणि काही इस्लामिक राष्ट्रांनी पाठिंबा दिला असला तरी जगातील सर्व प्रमुख देश भारतच्या बाजूने आहे हे पाकिस्तानने विसरू नये. पाकिस्तानने जर पुन्हा भारताची कुरापत काढली तर त्याची शिक्षा पाकिस्तानला मिळेलच यात शंका नाही. ऑपरेशन सिन्दुर यशस्वी करणाऱ्या भारताच्या सैन्यदलाला सॅल्युट! जयहिंद !!

लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## नाविन्यपूर्ण पीक लागवडीसाठी
# आत्मा ठाणे व मुरबाड कृषी विभागाचे आव्हान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : प्रकल्प संचालक आत्मा ठाणे व तालुका कृषी अधिकारी मुरबाड यांच्यामार्फत आव्हान करण्यात येते की मुरबाड तालुक्यातील शेतकऱ्यांनी भाताबरोबर नाविन्यपूर्ण पीक लागवडीकडे प्राधान्याने लक्ष देणे गरजेचे आहे. सदर नाविन्यपूर्ण पीक लागवडीमध्ये सोनचाफा, रताळी, सुरण, मोगरा,करटोली तसेच यांत्रिकीकरण पद्धतीने भात लागवड,पट्टा पद्धतीने भात लागवड ,चार सूत्री भात लागवड व एस आर टी पद्धतीने भात लागवड या गोष्टींचा समावेश केला तर आर्थिक उन्नती मध्ये वाढ होऊ शकते यासाठी शेतकऱ्यांनी त्या दृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे आहे.सदर पिकांसाठी कृषी विभाग प्रात्यक्षिक स्वरूपात तसेच कृषि विभागाच्या इतर योजनांची जोड देऊन मदत शेतकऱ्यांना उपलब्ध करून देऊ शकतो त्यासाठी लागवड करण्यास इच्छुक असलेल्या शेतकऱ्यांनी संबंधित कृषी सहाय्यक यांना संपर्क करावा त्यानुसार नियोजन करून लागवड साहित्य उपलब्ध करून खरीप हंगामत नाविन्यपूर्ण पिकांचा समावेश करण्यासाठी तालुका कृषी अधिकारी मुरबाड यांच्यावतीने आव्हान करण्यात येत आहे.

## पाकिस्तानवर भारताने केलेल्या बॉंब हल्लाचा
# डोंबिवली शिवसेना मध्यवर्ती शाखेच्या बाहेर जल्लोष

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




डोंबिवली : भारतीय सैन्याने मध्यरात्री पाकिस्तानात नऊ ठिकाणी मिशन सिंधुर नावाने मिसाईल बॉम्ब हल्ला करून पाकिस्तानातील दहशतवादी अतिरेक्यांच्या ठिकाणांवर कारवाई केली. या हल्ल्यात शेकडो अतिरक्यांचा खातमा करण्यात आला. देशातील निष्पाप नागरिकांचा जीव घेणाऱ्या अतिरेक्यांना मुळासकट उखडून टाकल्याने संपूर्ण भारतीय आनंदित झाले. अतिरेक्यांनी पहलगाम येथील केलेल्या अतिरेकी हल्ल्यात डोंबिवलीतील निष्पाप तीन तरुण मृत्युमुखी पडले. त्यांच्या मृत्यूमुळे तीन्ही कुटुंबियांचे मोठे नुकसान झाले. डोंबिवलीकरांवर हे एक मोठे संकट ओढवले होते. त्याचा बदला मंगळवारी भारताच्या सैनिकांनी घेतला. पाकिस्तानला चोख उत्तर दिले म्हणून डोंबिवली शिवसेना मध्यवर्ती शाखेच्या बाहेर आमदार राजेश मोरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिकांनी जल्लोष करीत आनंदोत्सव साजरा करून एकमेकांना पेढे भरविले.

शिवसेना डोंबिवली मध्यवर्ती शाखेसमोर मानपाडा रस्त्यावर डोंबिवली शिवसेना शहरपरमुख तथा कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे, शिवसेना उपजिलहाप्रमुख राजेश कदम, माजी नगरसेवक जनार्दन म्हात्रे, संजय पावशे, पदाधिकारी संतोष चव्हाण, सतीश मोडक, गजानन व्यापारी, सागर दुबे, तेजस पाटील, दिनेश शिवलकर, कविता गावंड, रश्मी चव्हाण यांच्यासह शेकडो शिवसैनिकांनी जल्लोष केला. यावेळी पाकिस्तानचा झेंडा फाडून पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा देत परिसर दणाणून सोडला.

यावेळी आमदार राजेश मोरे म्हणाले, पाकिस्तानातील दहशतवादी अतिरेक्यांनी जम्मू-काश्मीर येथील पहलगाम येथे भ्याड हल्ला करून, दहशतवाद्यांनी निष्पाप नागरिकांचा बळी घेतला होता. त्या वृत्तीचा आज भारताने बदला घेवून पाकिस्तानी अतिरेक्यांना जशास तसे उत्तर दिले आहे. संपूर्ण जगाला माहित आहे की भारतातील जम्मू काश्मीर मधील पहलगाम मध्ये पर्यटकांवर अतिरेक्यानी हल्ला 28 जणांना जीवे ठार मारून बहिणीने कुंकू पुसले. अतिरेकी हल्लात डोंबिवलीतील संजय लेले, हेमंत जोशी आणि अतुल मोने बळी गेले. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन करण्यासाठी गेले असता ते कुटुंबिय म्हणाले, अतिरेकयांवर हल्ला होईल, पाकिस्तानवर हल्ला करतील तेव्हा त्यांना श्रद्धांजली मिळेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गमिनी काव्याप्रमाणे पाकिस्तानमधील अतिरेक्यांच्या नऊ ठिकाणावर एअरस्टाईक करून अतिरेक्याना ढगात पाठवले.

यावेळी कविता गांवड म्हणाल्या, पाकिस्तानने भारतवर छुपे हल्ले करणे बंद करा. बहिणीचे कुंकू पुसलं त्यांना भारत सरकारने ऑपरेशन सिंदूर करून धडा शिकवला आहे.

तर रश्मी गव्हाणे म्हणाल्या, पाकिस्तान मुर्दाबाद, हिंदूस्थान जिंदाबाद. या पाकिस्तानला जगाच्या नकाशातून मिटवले पाहिजे.

# कल्याण पूर्वेत रिक्षावर झाड पडून तिघांचा मृत्यू
## रिक्षाचालकासह दोन प्रवाशांचा समावेश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : अचानक सुटलेल्या सोसाट्याच्या वाऱ्यामुळे भलेमोठे झाड चालत्या रिक्षावर पडून तिघा जणांचा मृत्यू झाल्याची वेदनादायी घटना कल्याण पूर्वेत घडली आहे. यामध्ये रिक्षाचालकासह दोन प्रवाशांचा समावेश असून त्यामध्ये एक महिला प्रवासी असल्याची माहिती केडीएमसीचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना दिली आहे.

मंगळवारी रात्री नऊ ते साडे नऊ वाजण्याच्या सुमारास अचानक सोसाट्याचा वारा सुटला आणि विजांच्या लखलखाटासह पावसाने हजेरी लावली. मात्र या वाऱ्याचा वेग इतका जबरदस्त होता की कल्याण पूर्वेत काही ठिकाणी भलेमोठे वृक्ष उन्मळून पडले. यामध्ये काही ठिकाणी सुदैवाने कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती समोर आली असतानाच चिंचपाडा परिसरात चालत्या रिक्षावरही मोठे झाड पडल्याची माहिती मिळाली.

दरम्यान ही माहिती मिळताच स्थानिक नागरिक, समाजसेवक महेश गायकवाड यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यापाठोपाठ कल्याण डोंबिवली महानगरपालिका अग्निशमन दलाच्या जवानही घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी रिक्षावर पडलेले भलेमोठे गुलमोहराचे झाड बाजूला करण्याचे प्रयत्न सुरू केले. या दुर्घटनेची माहिती मिळताच आमदार सुलभा गायकवाड यांनी देखील तातडीने अग्निशमन विभाग, पोलीस प्रशासन यांच्याशी संपर्क साधत मदतकार्य सुरू केले.

अग्निशमन दलाने अथक प्रयत्न करून या रिक्षातील तिघा जखमींना रुक्मिणीबाई रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. मात्र उपचार करण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती डॉक्टरांनी दिल्याचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी सांगितले. यामध्ये रिक्षाचालकासह दोन प्रवाशांचा समावेश असून त्यामध्ये एक महिला प्रवासी आहे. उमाशंकर वर्मा वय 52 वर्ष, लता दत्ताराम राऊत वय 47 वर्ष, तुकाराम शामराव खेंगले वय 45 अशी या मृतांची नावे आहेत. तर या घटनेमध्ये रिक्षेचा अक्षरशः चेंदामेंदा झाला आहे.

या दुर्दैवी प्रसंगी केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल, पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, सहाय्यक आयुक्त कल्याणजी घेटे, विधानसभा निवडणूक प्रमुख संजय मोरे, शिवसेना शहर प्रमुख निलेश शिंदे, प्रशांत काळे, कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक गणेश न्हायदे व अग्निशमन अधिकारी घटनास्थळी उपस्थित होते.

# वाशी खारेपाटाला घराघरात नळाद्वारे पाणी हवे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : करोडोचा निधी,पाणी मात्र नाही.पाइप गल्लोगल्ली,काही दिवस नियमित तीन दिवसातून पाणी,ते पण दूषित.पाणीपट्टी मात्र वर्षाची ,इलेक्शन झाले,त्या काळात विपुल पाणी दिले.म्हणजे नैवद्यच म्हणायला हरकत नाही.खारेपाट विभागाला हा शाप आहे.भूमिपुत्र सामाजिक संघटना भाल,सर्व पक्षीय ग्रामस्थ,पाणी पुरवठा अधिकारी रवींद्र पाचपोर व राठोड साहेब यांच्या कार्यालयात ठिय्या देऊन सदर बाबीचे गांभीर्य दाखवून दिले.मात्र पुढील काही दिवसांपासून नियमित पाणी सोडले जाईल ते पण टँकरने पाणी पुरवठा केला जाईल मात्र हेटवणे धरणात विपुल पाणी असताना टँकर हा उपाय नाही हे त्यांच्या लक्षात आणून दिले. दुबार पिकाची ज्या प्रमाणे काळजी घेऊन त्यांच्या साठी कालव्याचे पाणी बंद करून कृत्रिम पाणी यांची निर्माण केली जाते. टँकर नको पाईप द्वारे पाणी द्या असे निलेश म्हात्रे,प्रकाश म्हात्रे, कल्पेश म्हात्रे, प्रवीण म्हात्रे, व सर्वपक्षीय ग्रामस्थ यांनी उग्र आंदोलनाचा इशारा देताच गावातील पाणी पुरवठा विहिरीत, आणि पाईप द्वारे केला जाईल असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### जनतेची मागणी

> घरात दिलेल्या नळांना व्यवस्थित पाणी येत असताना अचानक विहरित किंवा टॅंकर द्वारे पाणी पुरवाठा कशाला? आम्हाला घराघरात दिलेले नळ शोभेसाठी आणि फक्त पाणीपट्टी भरण्यासाठीच दिलेत का ?
>
> – प्रवीण कालिदास म्हात्रे, विठ्ठल वाडी

> ग्रामीण पाणी पुरवठा करणारे कर्मचारी उर्मट झाले आहेत. नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा करण्यासाठी कर्मचारी यांची नेमणूक केलेली आहे हेच ते विसरले आहेत. नागरिकाच्या समस्यांशी यांना घेणेदेणे नाही म्हणून हे नागरिकाचे फोन नंबर ब्लॉक करून ठेवत आहे.
>
> – कल्पेश परशूराम म्हात्रे, सचिव भु.सा.वी. संघटना

## 'यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियान' अंतर्गत
# शहापूर पंचायत समिती, जिल्हा परिषद ठाणे यांना कोकण विभागातून पुरस्कार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ग्रामीण विकास विभाग, महाराष्ट्र शासन अंतर्गत 2023-24 या वर्षासाठी आयोजित "यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियान" अंतर्गत पंचायत समिती शहापूर, जिल्हा परिषद ठाणे यांना कोकण विभागातून प्रथम क्रमांकाचा गौरव मिळाला आहे. या पुरस्कारामध्ये ₹ 11 लाखांचे पारितोषिक प्रदान करण्यात आले आहे.

हा पुरस्कार पंचायत राज संस्थांनी केलेल्या उत्कृष्ट कार्याच्या मूल्यमापनावर आधारित असून, पंचायत समिती शहापूर यांनी लोकसहभाग, डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि पारदर्शक प्रशासन यात उल्लेखनीय कार्यगती साधल्यामुळे त्यांची निवड करण्यात आली आहे.

या गौरवाबद्दल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी शुभेच्छा देताना सांगितले की, "शहापूर पंचायत समितीने गावपातळीवरील विकासकामांमध्ये सातत्य ठेवून अन्य तालुक्यांसाठी आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या कार्याची दखल राज्यस्तरावर घेतली गेली याचा अभिमान वाटतो."

तसेच पंचायत समिती शहापूरच्या गटविकास अधिकारी नम्रता जगताप यांनी यावेळी म्हटले की, "हा पुरस्कार म्हणजे आमच्या टीमच्या एकत्रित मेहनतीचं फलित आहे. आम्ही भविष्यातही विकासकामांमध्ये नावीन्य व गुणवत्ता जपण्याचा प्रयत्न करत राहू."

हा सन्मान पंचायत समिती शहापूरच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या एकजुटीने व नागरिकांच्या सहकार्याने मिळवलेला आहे. यामुळे भविष्यातील कार्यासाठी त्यांना अधिक प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा आहे.

# सायबर गुन्ह्यांपासून बचावासाठी नागरिकांनी सजग रहावे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : डिजिटल युग अधिक प्रगत होत आहे, तसतसे सायबर गुन्ह्यांचे स्वरूप बदलत आहे. सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य नागरिकांनी अधिक सजग राहावे, असे आवाहन नॅस्कॉमचे अधिकारी प्रसाद देवरे यांनी सांगितले. 'टेक-वारी' कार्यक्रमाच्या निमित्ताने मंत्रालयात 'सायबर सुरक्षा' विषयावर प्रसाद देवरे यांचे व्याख्यान झाले. त्यावेळी ते बोलत होते.

श्री.देवरे म्हणाले, डीप फेक व्हिडीओ, डेटा चोरी रोखण्यासाठी सतर्कता बाळगा. सर्व ऑनलाइन खात्यांसाठी मजबूत पासवर्ड ठेवा तसेच दुहेरी प्रमाणीकरण प्रणाली वापरा. अनोळखी व्यक्तींचे ई-मेल, मेसेजमधील लिंक्स उघडू नका. स्मार्टफोन, लॅपटॉप आणि 'आयओटी' डिव्हायसेसचे सॉफ्टवेअर वेळोवेळी अपडेट करा. सार्वजनिक वायफाय वापरताना काळजी घ्या. बँकिंग किंवा खरेदीसाठी फक्त बँक किंवा अधिकृत प्रदात्यांचे ॲप्स वापरा. सायबर गुन्हेगार वेगवेगळ्या क्लृप्त्यांनी सामान्य जनतेला आपल्या जाळ्यात अडकवतात. त्यामुळे कोणताही संशयास्पद मजकूर किंवा संदेश फॉरवर्ड करताना प्रत्येकाने अत्यंत सतर्क राहावे. सायबर सुरक्षेसाठी काळजी घेणे ही आजच्या काळाची नितांत गरज असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

-प्रसाद देवरे







## गीतासार



### अध्याय १०
### विभूतियोगः

अश्वत्थः सर्ववृक्षाणां देवर्षीणां च नारदः । गन्धर्वाणां चित्ररथः सिद्धानां कपिलो मुनिः ॥ १०-२६ ॥

सर्व वृक्षांत पिंपळ आणि देवर्षींमध्ये नारद मुनी, गंधर्वांमध्ये चित्ररथ आणि सिद्धांमध्ये कपिल मुनी मी आहे. ॥ १०-२६ ॥

उच्चैःश्रवसमश्वानां विद्धि माममृतोद्भवम् । ऐरावतं गजेन्द्राणां नराणां च नराधिपम् ॥ १०-२७ ॥

घोड्यांमध्ये अमृताबरोबर उत्पन्न झालेला उच्चैःश्रवा नावाचा घोडा, श्रेष्ठ हत्तींमध्ये ऐरावत नावाचा हत्ती आणि मनुष्यांमध्ये राजा मला समज. ॥ १०-२७ ॥

आयुधानामहं वज्रं धेनूनामस्मि कामधुक् । प्रजनश्चास्मि कन्दर्पः सर्पाणामस्मि वासुकिः ॥ १०-२८ ॥

मी शस्त्रांमध्ये वज्र आणि गाईंमध्ये कामधेनू आहे. शास्त्रोक्त रीतीने प्रजोत्पत्तीचे कारण कामदेव आहे आणि सर्पांमध्ये सर्पराज वासुकी मी आहे. ॥ १०-२८ ॥

अनन्तश्चास्मि नागानां वरुणो यादसामहम् । पितृणामर्यमा चास्मि यमः संयमतामहम् ॥ १०-२९ ॥

मी नागांमध्ये शेषनाग आणि जलचरांचा अधिपती वरुणदेव आहे आणि पितरांमध्ये अर्यमा नावाचा पितर आणि शासन करणाऱ्यांमध्ये यमराज मी आहे. ॥ १०-२९ ॥

प्रह्लादश्चास्मि दैत्यानां कालः कलयतामहम् । मृगाणां च मृगेन्द्रोऽहं वैनतेयश्च पक्षिणाम् ॥ १०-३० ॥

मी दैत्यांमध्ये प्रह्लाद आणि गणना करणाऱ्यांमध्ये समय आहे. तसेच पशूंमध्ये मृगराज सिंह आणि पक्ष्यांमध्ये मी विनितापुत्र गरुड आहे. ॥ १०-३० ॥

## रेसिपी
### रव्याचे नगेट्स



साहित्य : रवा – 1 कप,ताजे वाटाणे – 1 कप, उकडलेले बटाटे – 3, हिरवी कोथंबिर – 2 ते 3 चमचे, हिरवी मिरची – 2, हळद – 1/2 टीस्पून, धने पावडर – 1.5 टीस्पून, लाल तिखट – 1/ 2 टीस्पून, आमचूर, – 1/2 टीस्पूनगरम मसाला – ½, टीस्पून, मीठ – 1. टीस्पून, तळण्यासाठी तेल

कृती- प्रथम रव्याचे पीठ तयार करून घ्या. नंतर एका भांड्यात 2 कप पाणी घाला. त्यात चवीनूसार मीठ आणि 2 चमचे तेल घाला.मध्यम आचेवर पाणी उकळू लागेपर्यंत झाकून ठेवा.सतत ढवळत राहा, मंद आचेवर रवा घट्ट होईपर्यंत शिजवा.रवा घट्ट झाल्यावर गॅस बंद करा. थोडासा थंड होऊ द्या.थोडासा थंड होऊ लागला आणि हाताने मळून घेता येईल. सारणासाठी उकडलेले बटाटे सोलून. भांड्यात काढून चमच्याने मॅश करा. आता एका कढईत तेल गरम करा.यानंतर त्यात मटार टाका आणि 2 ते 3 मिनिटे शिजवा जेणेकरून वाटाणे पूर्णपणे शिजून मऊ होतील.या मिश्रणात आता बारीक चिरलेल्या हिरव्या मिरच्या घाला.1.5 टीस्पून धणे पावडर त्यात हळद, लाल मिरची पावडर, आणि मीठ, गरम मसाला आणि थोडी हिरवी धणे घालून मिक्स करावे.हे मिश्रण थोडे परतून घ्या.त्यानंतर त्यात मॅश केलेले बटाटे घालून मिक्स करून गॅस बंद करा.मिश्रण थंड झाल्यावर हाताने मिश्रणाला गोल आकार द्या आणि प्लेटमध्ये ठेवा.आता रव्याच्या पिठाचा एक गोळा घेऊन त्यालाउभट किंवा गोलाकार आकार द्या.त्यात बनवलेले बटाट्याचे सारण भरा.सगळ्या मिश्रणाचे गोळे तयार करून घ्या. तेल मध्यम गरम झाल्यावर त्यात बनवलेले रव्याचे गोळे टाका.तयार नगेट्स गोल्डन ब्राऊन होईपर्यंत तळून घ्या.तयार झालेले नगेट्स हिरवी पूदीना चटणीसोबत सर्व्ह करा.

# शिवसेनेकडून ऑपरेशन सिंदूरचा ठाण्यात जल्लोष

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ऑपरेशन सिंदूर या मोहीमेचे संपूर्ण देशात स्वागत केले जात आहे. लष्कराच्या कारवाईबद्दल सर्वत्र जल्लोष केला जात आहे. ठाण्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शिवसेनेकडून अभिनंदनाचे फलक ठिकठिकाणी उभारण्यात आले आहे. शहरातील महत्त्वाच्या तसेच अंतर्गत भागात हे फलक लावल्याने हे फलक ठाणेकरांचे लक्ष वेधून घेत आहे. या फलकांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे छायाचित्र आहे. 'भारतीय सैन्यदलाचे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन' असे या फलकावर मजकूर आहे. फलकांखाली एकनाथ शिंदे आणि शिवसेना परिवार असेही लिहीण्यात आले आहे.




काश्मीर येथेल पहलगाममध्ये निष्पाप पर्यटकांची अतिरेक्यांनी गोळ्या झाडून हत्या केली. या घटनेनंतर संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली होती. पाकिस्तानला धडा शिकविण्याबरोबरच अतिरेक्यांचा खात्मा करण्याची मागणी केली जात होती. बुधवारी मॉक ड्रील घेण्यात येणार होती. परंतु त्यापूर्वीच लष्कराने अचानक पाकिस्तानमधील अतिरेक्यांच्या तळावर हवाई हल्ले केले. या हल्ल्याला 'ऑपरेशन सिंदूर हे नाव देण्यात आले होते. ऑपरेशन सिंदूर मोहीमेच्या यशानंतर सर्वत्र आनंद व्यक्त केला जात आहे. अनेकांनी समाज माध्यमांवर त्या विषयी प्रतिक्रिया दिली. ठाण्यातील टेंभीनाक्यावर शिवसेना शिंदे गटाने जल्लोष साजरा करण्यात आला. तसेच पाकिस्तानचा राष्ट्रध्वज देखील यावेळी जाळण्यात आला. सर्वांनी पेढे वाटून भारताचे आनंद साजरा केला.

बुधवारी सायंकाळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या शिवसेनेने ठाण्यातील मुख्य चौकात तसेच अंतर्गत शहरात ठिकठिकाणी लष्कराच्या आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अभिनंदनाचे फलक उभारले आहेत. हे फलक ठाणेकरांचे लक्ष वेधून घेत आहेत. या फलकावर ऑपरेशन सिंदूर बाबत लष्कर तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अभिनंदनाचा वर्षाव करणारा मजकूर लिहीण्यात आला आहे. फलकावर पंतप्रधान नरेंद्र मोदी हे लष्कराच्या पोषाखातील छायाचित्र दिसत आहे. तसेच फलकावर 'रक्त आमच शिवरायांचं माती पाकड्यांना चाखऊ, कुंकवाची किंमत काय असते भाड्यांना दाखवू असेही फलकावर म्हटले आहे.

## रुक्मिणीबाई रुग्णालय-महिला मृत्यूप्रकरण

# हलगर्जी करणाऱ्यांवर कारवाई

### - अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण येथील बाई रुक्मिणीबाई रुग्णालयात दिनांक ५.५.२०२५ रोजी दुपारी १.१५ वाजता श्रीमती सविता गोविंद बिरादार, वय ४३ ही महिला डाव्या हातामध्ये अशक्तपणा अशी तक्रार घेऊन अपघात कक्षात उपचाराकरिता दाखल झाली होती. यावेळी रुग्णालयातील अपघात कक्ष विभागात बाह्य संस्थेमार्फत नियुक्त असणारे डॉ. उमेर पटेल यांनी सदर रुग्णाला तपासले सेरिब्रो व्हॅस्क्युलर एक्सीडेंट ची शक्यता वाटल्यामुळे त्यांनी सदर रुग्णाला रुक्मिणीबाई रुग्णालयातील तज्ञ फिजिशियन डॉक्टर निशिकांत शर्मा, यांच्याकडे संदर्भित केले. फिजिशियन डॉ. निशिकांत शर्मा यांनी रुग्णाला तपासल्यानंतर सदर रुग्णाला केईएम रुग्णालय, मुंबई किंवा छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा येथे न्यूरोलॉजिस्ट चा सल्ला घेऊन पुढील उपचार करण्याचा सल्ला दिला होता. त्यानुसार संदर्भ चिठ्ठी दुपारी २.०० देण्यात आली होती. रुग्णाच्या नातेवाईकांना रुग्णवाहिकेसाठी असलेले शुल्क भरण्याबाबत सूचित केले असता त्यांनी शासनाच्या १०८ क्रमांकावर फोन करून रुग्णवाहिका मागवण्याचा प्रयत्न केला तथापि १०८ क्रमांकावरून मदतीची रुग्णवाहिका उपलब्ध झाली नाही. अपघात कक्षातील ऑन ड्युटी स्टाफ नर्स श्रीमती कोमल दिघे, श्रीमती नमिता




भोये व सिस्टर इन्चार्ज श्रीमती जयश्री रायकर यांनी ऑन ड्युटी वाहन चालक यांना दुपारी २.१५ वाजता रुग्णसंदर्भित करण्याबाबत कळवले होते, परंतु प्रत्यक्षात ३.१० वाजता रुग्णवाहिका रुग्णाला स्थलांतरित करण्याकरिता उपलब्ध झाली.

सदर रुग्णाला रुग्णवाहिकेत हलवताना रुग्णाची तब्येत खालावली त्यामुळे पुनश्चः रुग्णाला अपघात कक्षामध्ये आणण्यात आले. दरम्यान वाहन चालक श्री. मारुती निकम सदर रुग्णवाहिका घेऊन डिझेल भरण्यासाठी घेऊन गेले. अपघात कक्षामध्ये कर्तव्यावर उपस्थित डॉक्टर यांनी रुग्णाला तपासले असता रुग्णाचे पल्स रेट व रक्तदाब मोजता येत नव्हता. त्यामुळे वैद्यकीय अधिकारी यांनी तात्काळ Cardiopulmonary Resususcitation चालू केले आणि रुग्णाला Ing. Atropime, Ing.Adrenaline ऑक्सीजन देण्यात आले तरीही रुग्णाचा प्रतिसाद मिळाला नाही. डॉक्टरांनी प्रयत्न करूनही रुग्णाचा दुपारी ३.४५ वाजता मृत्यू झाला आहे.

सदर घटनेची प्राथमिक चौकशी वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत करण्यात आली असून प्राथमिक चौकशी अहवालात रुग्णवाहिका चालक श्री. हरिश्चंद्र यशवंतराव, श्री. प्रमोद लासुरे यांनी कर्तव्यावर उपस्थित असताना रुग्णवाहिकेतून रुग्णाला स्थलांतरित करण्यामध्ये दिरंगाई केल्याचे आणि श्री. मारुती निकम यांनी रुग्णवाहिका अनावश्यकरित्या डिझेल भरण्यासाठी घेऊन गेल्यामुळे त्यांच्या कर्तव्यात कसूर केल्याचे दिसून आल्यामुळे तसेच अपघात कक्षातील परिचारिका श्रीमती नमिता भोये, सिस्टर इन्चार्ज श्रीमती जयश्री रायकर यांनी मुख्य वैद्यकीय अधिकारी यांना सदर रुग्ण स्थलांतरित झाले नसल्याची माहिती दिली नाही. तसेच डॉ. उमेर पटेल यांनी रुग्णाला स्थलांतरित करण्यासाठी संबंधित वाहनचालक यांच्याकडे पाठपुरावाही केला नाही किंवा वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनाही अवगत केले नाही.

सदर रुग्ण वेळेवर स्थलांतरित झाले असते तर त्यांना वेळेवर उपचार चालू झाले असते आणि रुग्णाचा जीव वाचू शकला असता असे निष्कर्ष झाल्यामुळे सिस्टर इन चार्ज श्रीमती जयश्री रायकर, वाहन चालक श्री. प्रमोद लासुरे, श्री. मारुती निकम आणि श्री. हरिश्चंद्र यशवंतराव यांच्यावर तात्काळ प्रभावाने निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. तसेच बाह्य संस्थेमार्फत नियुक्त असणारे वैद्यकीय अधिकारी डॉ. उमेर पटेल आणि परिचारिका श्रीमती नमिता भोये यांना सेवेतून कमी करण्यात आले आहे. तसेच रुक्मिणीबाई रुग्णालयाच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी आणि वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्यामार्फत देखील सदर घटनाक्रमाबाबत खुलासा मागवण्यात आलेला आहे. अशी माहिती अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी प्रसिद्धी पत्रकामार्फत दिली आहे

**सिस्टर इन चार्ज जयश्री रायकर, वाहन चालक प्रमोद लासुरे, मारुती निकम आणि हरिश्चंद्र यशवंतराव यांच्यावर निलंबनाची कारवाई**

**-----**

**बाह्य संस्थेमार्फत नियुक्त वैद्यकीय अधिकारी डॉ. उमेर पटेल आणि परिचारिका नमिता भोये सेवेतून कमी**

## उल्हासनगर मनपाच्या आयुक्त

# मनीषा आव्हाळे यांचा गौरव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** महाराष्ट्रात राबवण्यात आलेल्या शंभर दिवसांच्या कृती आराखड्याच्या मूल्यमापणात उल्हासनगर महानगरपालिकेने प्रथम क्रमांक पटकावल असून मनीषा आव्हाळे ह्या सर्वोत्तम आयुक्त ठरल्या आहेत. त्याची पोचपावती म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मनीषा आव्हाळे यांचा सन्मान करण्यात आला.




100 दिवसांचा सुधारणा कार्यक्रम अंतर्गत विजेत्यांचा गुणगौरव सोहळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात मनीषा आव्हाळे यांचा सन्मान करण्यात आला.

विशेष म्हणजे महानगरपालिकेच्या स्थापनेपासूनच्या इतिहासात पहिल्यांदा विदर्भ कन्या असलेल्या आयएएस अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी आयुक्त पदाचा पदभार स्विकारला आहे. शंभर दिवसांच्या कृती आराखड्यात कार्यालयीन मूल्यमापन करण्यासाठी त्यांना 90 दिवसांचा कालावधी मिळाला होता. त्यात त्यांनी शहरात 4 शाळा आणि 5 रस्ते आदर्श करण्याचे काम हाती घेतले आहे.. महानगरपालिकेत येणाऱ्या अभ्यागतांसाठी व्हिजिटर्स मॅनेजमेंट सिस्टीम ॲप लावण्यात आल्याने त्यांची फोटोसह डिजिटल एन्ट्री होणार आहे.

त्यांच्यासाठी बसण्याची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. नगरपरिषद असल्यापासूनच्या कागदपत्रांचे वर्गीकरण करण्यात आल्याने लेखा विभाग, मालमत्ता कर विभाग, नगररचना विभाग आदींच्या कार्यालयांना कॉर्पोरेट लुक मिळाला आहे. पालिकेच्या भिंतीवर शहरातील विकास व ऐतिहासिक मंदिरे आदींचे चित्र लावण्यात आल्याने येणारे नागरिक कौतुक करून जाऊ लागले आहेत. मराठीतील दिशादर्शक फलक व 303 दालनांचे नंबर लक्षवेधक दिसू लागले आहेत. सहायक संचालक नगररचना ललित खोब्रागडे यांनी नगररचना विभागाचा तसेच कर निर्धारक व संकलक निलम कदम यांनी मालमत्ता कर विभागाचा प्रथमदर्शनी भाग मोठ्या बोर्डने झळकावून टाकला आहे. महानगरपालिकेच्या चौकाला स्मार्ट लुक देण्यात आला आहे.

तसेच संकेतस्थळ तयार करण्यात आले पालिकेतील सर्व कागदोपत्री कारभाराचे रूपांतर संगणकीकरणात झाले आहे. त्यामुळे आता यापुढे फाईल दिसत नसल्याच्या किंबहूना गहाळ झाल्याच्या प्रकाराला पूर्णविराम मिळाला आहे.

हा सर्व अनपेक्षित बदल झाल्याने कृती आराखड्याच्या सर्वेक्षणात उल्हासनगर महानगरपालिकेच्या पहिल्या 6 मध्ये समावेश झाला होता. त्यानुसार समितीने महानगरपालिकेत येऊन आढावा घेतला होता. महानगरपालिकेचा झालेला कायापालट आणि योजनांची माहिती प्रोजेक्टरवर बघून समिती कमालीची प्रभावित झाली होती.

## उल्हासनगर मनपाची

# अनधिकृत व्यवसायांवर कारवाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर, ता. ७ (वार्ताहर)** : अनधिकृत व्यवसायांवर वचक ठेवण्यासाठी उल्हासनगर महापालिका प्रशासनाने पुन्हा एकदा कडक पावले उचलली आहेत. प्रभाग समिती ४च्या कार्यक्षेत्रातील कॅम्प नंबर ५ येथील टँकर पॉइंट रोड परिसरात परवानगीशिवाय सुरू असलेल्या जीन्स वॉश कारखान्यांवर बुधवारी (ता. ७) कारवाई करण्यात आली. सहाय्यक आयुक्त गणेश शिंपी यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या पथकाने हे सर्व कारखाने तत्काळ बंद केले आहे. विशेष म्हणजे, महावितरण विभागानेही या कारखान्यांचा वीजपुरवठा खंडित करून मीटर जप्त केले. त्यामुळे अनधिकृत कारभाराला मोठा झटका बसला आहे.



उल्हासनगर महापालिकेची कोणतीही परवानगी नाही. तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाचाही दाखला नाही. कोणतीही अग्निशमन यंत्रणा नाही, असे कायदेशीर दस्तावेज नसताना बिनधास्त हे कारखाने सुरू होते. या कारखान्यांमुळे परिसरात प्रदूषण व रहिवाशांना त्रास होत असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे काही दिवसांपासून येत होत्या. त्यानुसार महापालिकेने कारवाई करत अनधिकृत कारखान्यांवर कारवाई करत सील केले. महावितरण विभागानेही या कारखान्यांची वीजजोडणी तत्काळ बंद केली. काही ठिकाणी अनधिकृत वीज वापरण्यात येत असल्याचे आढळून आले. त्यामुळे मीटर जप्त करण्यात आले आहेत. वीज चोरणाऱ्यांविरोधात कारवाईसाठी पावले उचलली जातील, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. उल्हासनगर महापालिकेने स्पष्ट सांगितले की, अनधिकृत औद्योगिक कामे पुन्हा सुरू केल्यास संबंधितांवर दंडात्मक व फौजदारी कारवाई केली जाईल. यासोबतच अन्य परिसरातही अशीच पाहणी मोहीम राबवण्यात येणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत.

जीन्स वॉश कारखान्यांमुळे परिसरात रसायनयुक्त सांडपाणी मुक्तपणे सोडले जात होते. त्यामुळे पर्यावरण आणि नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले होते. याप्रकरणी प्रदूषण नियंत्रण मंडळालाही पुढील तपासणीसाठी सूचना देण्यात आली आहे.

> **"शहरात बेकायदा आणि पर्यावरणाला घातक व्यवसाय मुळासकट हद्दपार करणे ही आमची जबाबदारी आहे. कोणतीही परवानगी न घेता सुरू असलेले तीन जीन्स वॉश कारखाने तत्काळ बंद केले आहेत. यापुढेही अशी कारवाई सुरू राहील.**
>
> **- गणेश शिंपी, सहाय्यक आयुक्त**

## भिवंडी पालिका आयुक्तांकडून

# नालेसफाईची पहाणी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

**भिवंडी :** आयुक्तांनी नाले सफाईच्या कामाची केली पहाणी... महानगरपालिकेने मॉन्सुनपुर्व तयारीच्या अनुषंगाने नाले सफाईच्या कामास सुरूवात केली आहे. आज मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर यांनी स्वत: प्रभाग समिती क्र. 1 मधील आरीफ गार्डन, अन्सारी प्ले ग्राऊंडच्या बाजूला असलेला नाला या ठिकाणी भेट देऊन कामाची पहाणी केली. सदर पहाणी वेळी आयुक्तांनी नाले सफाई पुर्ण तळापासुन करण्यात यावी अशा सक्त सुचना ठेकेदारांना दिल्या.

तसेच आरोग्य निरीक्षक, मुकादम यांनी सतत सफाईचा ठिकाणी उपस्थित राहुन काम निकषांनुसार होत आहे किंवा कसे याची पहाणी करुन दैनंदिन अहवाल आयुक्तांना सादर करण्याचे आदेश दिले. तसेच, ठेकेदाराने कामामध्ये कोणतीही दिरंगाई न करता जलदगतीने काम करण्याच्या सुचना दिल्या. नाल्याबाहेर निघालेला गाळ हा तातडीने उचलुन योग्य त्या ठिकाणी स्थलांतरीत करण्याच्या सुचना दिल्या, जेणेकरुन नागरीकांना दुर्गंधीचा त्रास होणार नाही. उपायुक्तांनी प्रत्येक ठिकाणी एक समन्वय अधिकारी नेमुन त्यांना देखील दररोज नाले सफाईच्या पहाणीचे निर्देश दिले.

शहर अभियंता, उपअभियंता यांनी देखील दररोज किमान 5-6 ठिकाणी भेट देऊन आवश्यक यंत्रसामुग्री ठेकेदाराने पुरविली आहे किंवा कसे याची पडताळणी करण्याचे निर्देश दिले. आयुक्तांच्या सुचनेनुसार आज अतिरीक्त आयुक्त (1) श्री. देविदास पवार यांनी देखील प्रभाग 3, वॉर्ड क्र. 17 मधील राजू चाळ, धर्मा चाळ येथील नाला सफाई कामाची पहाणी केली.या प्रसंगी उपायुक्त (आरोग्य) श्री. विक्रम दराडे, सहायक आयुक्त (आरोग्य) श्री. शैलेश दोंदे, विभाग प्रमुख (आरोग्य) श्री. फैसल तातली, संबंधित आरोग्य निरीक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

## वाशिंद शहराला

# अवकाळीने झोडपले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वासिंद, ता. ७ :** परिसरात रात्री नऊच्या सुमारास वादळी वाऱ्याने अचानक थैमान घातल्याने बाजारपेठेत आलेल्या नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. परिसरातील काही भागात झाडे पडल्याने विद्युत पुरवठा रात्रभर बंद ठेवण्यात आला होता. तर अचानक पडलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांसह वीटभट्टी मालकांचे आर्थिक नुकसान झाले. वासिंद परिसरात सायंकाळपासूनच वातावरणात बदल जाणवत होता. रात्री अचानक सोसाट्याचा वारा सुटला. दहागाव, गेरसे, कोसले, भातसई गावात बहुतेक शेतकरी उन्हाळी भाजीपाल्याची लागवड करीत असतात. तर कातबावसारख्या बहुतेक आदिवासीवाडीवर गावठी कोंबडी, गाय, म्हैस, पशुपालन केले जाते. पशुसाठी ठेवलेल्या चाऱ्यासह फळझाडांचेदेखील नुकसान झाले. वीटभट्टीवर काम करणाऱ्या कामगारांनी बांधलेली गवताची घरे पाण्यात भिजल्याने रात्र जागून काढावी लागली. कच्ची वीट वाचविण्यासाठी त्यांची चांगलीच तारांबळ उडाली. पिवळी येथील दत्ता तांबे यांच्या घरावर आंब्याचे झाड कोसळले. यात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी घराचे पत्रे तुटून नुकसान झाले. वासिंद पूर्वेकडील दोन इमारतींचे पत्रे उडाले. बाजारपेठेत अर्धवट गटारांच्या बांधकामामुळे संपूर्ण घाण रस्त्यावर पसरली होती.

## जांभूळ गावात विजेच्या धक्क्याने

# तीन म्हशींसह एका इसमाचा मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण, ता. ७ (बातमीदार):** कल्याण तालुक्यातील जांभूळ गावात सोसाट्याच्या वाऱ्यामुळे कोसळलेल्या विजेच्या तारांच्या संपर्कात आल्याने एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे, तर दुर्दैवाने त्यांच्या तीन म्हशींचाही त्याच विजेच्या धक्क्याने मृत्यू ओढावल्याची दुर्दैवी घटना बुधवारी (ता. ७) रोजी सकाळी घडली. या दुर्दैवी घटनेनंतर महावितरणच्या पावसाळयापूर्वीच्या ढिसाळ नियोजनावर ग्रामस्थांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

जांभूळचे ग्रामस्थ आणि या तीन म्हशींचे मालक अनंता मधुकर आयरेकर होते. सर्वप्रथम विजेच्या तारेच्या संपर्कात त्यांची एक म्हैस आली. त्यांना आपल्या म्हशीला विजेचा धक्का बसल्याचे कळल्यावर तिला वाचवण्यासाठी त्यांनी धाव घेतली; मात्र तिला वाचवण्यासाठी गेलेल्या अनंता मधुकर आयरेकर यांनाही विजेचा धक्का बसला. त्यात त्यांचा मृत्यू झाला, अशी माहिती जांभूळचे सरपंच परिक्षित पिसाळ यांनी दिली. यानंतर त्यांच्या इतर दोन म्हशींनाही विजेचा धक्का बसला. या म्हशीसुद्धा त्याच विजेच्या तारेच्या संपर्कात आल्या होत्या.

**महावितरणच्या भोंगळ कारभाराचे बळी - नागरिक संतप्त**

बुधवारी जांभूळ गावात ही घटना घडली. यामुळे आयरेकर कुटुंबासह संपूर्ण गावावर शोककळा पसरली असून, एकाच घटनेत तीन म्हशींसह त्यांच्या मालकाचा मृत्यू झाल्याने अनेक जण शोक व्यक्त करत आहेत.

दरम्यान, याची माहिती संबंधित महावितरण अधिकाऱ्यांना देण्यात आली आहे, असेही सरपंच पिसाळ यांनी सांगितले आहे. यापूर्वीही काही घटनांमध्ये पावसाळयात उघड्या पडलेल्या विजेच्या तारांचा धक्का लागल्याने पाळीव प्राण्यांचा आणि व्यक्तींचा जीव गेलेला आहे. त्यामुळे अशा धोकादायक विजेच्या खांबांचे लेखापरीक्षण करून तातडीने कमकुवत खांबही बदलावेत, अशी मागणी केली जाते आहे. आता दुर्दैवी घटनेनंतर महावितरणला पान्हा फुटून खांबांच्या अवस्थेकडे तरी किमान लक्ष देईल, अशी आशा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.







दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

## ऑपरेशन सिंदूर फतेह ■ शहापुरात भाजपचा जल्लोष

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : ऑपरेशन सिंदूर राबवत भारतीय वायुसेनेने पाकिस्तानमध्ये केलेल्या एअर स्ट्राइकच्या सन्मानार्थ आज शहापुरात भारतीय जनता पक्षाकडून जल्लोष करण्यात आला. ही पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या बदल्याची सुरुवात आहे. भारताकडून पाकिस्तानात घुसून मोठी कारवाई करण्यात आली. पहलगाम येथील निरपराध भारतीयांवर पाकिस्तानने केलेल्या भ्याड हल्ल्याचा बदला घेण्यासाठी आज भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानमध्ये एअर स्ट्राइक करत पाकिस्तानला सडेतोड उत्तर दिले.भारताने केलेल्या या एअर स्ट्राइकच्या समर्थनार्थ आज भारतीय जनता पक्ष शहापूर तालुक्याच्यावतीने माजी आमदार पांडुरंग बरोरा यांच्या निवासस्थानी जयघोष करत आनंद व्यक्त करण्यात आला.तसेच भारतीय सेनेचे आभार व्यक्त करण्यात आले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या कारवाईने देशवासीयांच्या मनात असलेला रोष व्यक्त करत पाकिस्तानला करारा प्रत्युत्तर देण्यात आले.भारतीय महिलांच्या सिंदूरवर झालेल्या आघाताचा बदला घेण्यासाठी ही कारवाई करण्यात आल्याची प्रतिक्रिया मिळत आहे.या ऐतिहासिक कारवाईच्या समर्थनार्थ शहापुरात फटाके फोडून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.यावेळी माजी आमदार पांडुरंग बरोरा,भास्कर जाधव, विवेक नार्वेकर,सुभाष हरड, प्रकाश भेरे,राम जागरे, प्रकाश अंदाडे,प्रमोद बसवंत, निखिल बरोरा,गुरुनाथ भोईर आदि पदाधिकारी उपस्थित होते.



# मुरबाडमध्ये मेघ गर्जनेसह जोरदार पाऊस

### सतरा तास बत्ती गुल ■ उकाड्याने नागरिक हैराण ■ आंब्याच्या बागेसह, वीट भट्टीचे मोठे नुकसान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता







मुरबाड : मुरबाड तालुक्यात ग्रामीण तसेच आदिवासी पट्टयात व मुरबाड शहर परिसरात मंगळवारी रात्री पावणेदहा वाजता सुमारास जोरदार वादळी वाऱ्यासह मेघ गर्जना झाल्याने पावसामुळे वीटभट्टीचे नुकसान झाल्याची माहिती वीट भट्टीचे मालक दीपक धुमाळ यांनी दिली आहे.


या वादळी वाऱ्यामुळे जवळपास सतरा तास बत्ती गुल झाल्याने उकाड्याने नागरिकांना उष्मगामाशी सामना करावा लागला ,तसेच बुधवारी सुद्धा पावसाने सकाळपासूनच जोरदार सुरुवात केल्याने काही काल हवेत गारवा निर्माण झाला होता. परंतु बुधवारी सुद्धा ग्रामीण भागात व शहरी भागात विज पुरवठा खंडित झाल्याने छोट्या -मोठ्या उद्योग व्यवसायावर मोठा परिणाम झाल्याचे चित्र दिसून आले. तसेच जनावरांसाठी ठेवलेल्या चारा सुद्धा या वादळी वाऱ्याच्या पावसात भिजून गेला आहे.

*"महावितरण कंपनीच्या ग्रामीण भागात विद्युत तारा बऱ्याच वर्षापासून जीर्ण झाल्या आहेत त्यामुळे दरवर्षी पावसाळयात विद्युत पुरवठा १०ते १५ तास विजपुरवठा खंडित होतो, तसेच मंगळवार व बुधवार दोन दिवस वादळीवाऱ्यासह पाऊस बरसल्याने ठीक ठिकाणी विद्युत तारा तुटल्या आहेत त्यामुळे यावर रामबाण उपाय म्हणजे महावितरण कंपनीने तात्काळ केबल बसवावा अशी ग्राहकांनी मागणी केली आहे.

या वादलीवाऱ्यामुळे तालुक्यातील आदिवासी पट्टयात तसेच ग्रामीण भागात जोरदार तडाका बसला आहे या तडाख्यात आंब्याच्ये तसेच वीटभट्टीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे ,तर मुरबाड- कल्याण या राष्ट्रीय मार्ग असलेल्या शिवळे पेट्रोल पंपाजवळ वडाच्या झाडाची मोठी फांदी कारवर पडून कारचे नुकसान झाले आहे तर कार मधील इसम किरकोळ जखमी झाला आहे.

ग्रामीण भागात सध्याच्या घडीला हळदी समारंभाचा कार्यक्रम जोरात चालू आहे परंतु बुधवारी रात्री पावणेदहा वाजण्याच्या सुमारास वादळी वाऱ्याच्या पावसाने फटका दिल्याने हळदीच्या कार्यक्रमात एकच तारांबळ उडाली,, त्यामुळे रात्री हळदीचा कार्यक्रम व संध्याकाळी लग्नाच कार्यक्रम दोन्ही कार्यक्रमावर पावसाचे संकट असल्याचे चित्र दिसून येत आहे.

वादळी वाऱ्याचा फटका बसल्याने बहुतांशी भागात पंधरा ते वीस तास वीज पुरवठा खंडित झाल्याने नागरिकांना सतत दोन दिवस उकाड्याशी सामना करावा लागला. तर वादळी वाऱ्याच्या पावसामुळे म्हसा परिसरातील गवाली -जाभुर्डेयांच्यासह विविध ठिकाणी छोटी -मोठी झाडे उन्मळून पडली आहेत.




# भिवंडी पालिका क्षेत्रातील सर्वच मालमत्तांचे नव्याने सर्वेक्षण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्वच मालमत्तांचे नव्याने सर्वेक्षण करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. या सर्वेक्षणामुळे मालमत्तांचा बांधकाम परवानगी तपशील, क्षेत्रफळ, वापर इमारतीचा फोटो आणि मालमत्तेचा अंतर्गत नकाशा उपलब्ध होणार आहे. याशिवाय गेल्या काही वर्षात भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रात नवीन बेकायदा तसेच वाडीव बांधकामे करण्यात आलेली असून त्यांची माहिती पालिकेला सर्वेक्षणाद्वारे उपलब्ध होणार आहे. यामुळे मालमत्ता करापोटी मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ होणार आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मालमतांचे सर्वेक्षण करण्याचा उपक्रम सुरु करण्यात येणार आहे. यामध्ये ड्रोन तसेच तत्सम तंत्रज्ञान वापरुन जीआयएस सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणा दरम्यान सर्व मालमत्तांचे जिओ सिक्वेसिंग (विशिष्ट पद्धतीने क्रमांक देणे आणि जिओ रेफरसिंग (मालमत्तेचे लोकेशन नकाशावर नमुद करणे) करण्यात येणार आहे. तसेच सर्व मालमत्तांचे अंतर्गत मोजमाप देखील घेण्यात येणार आहे.




भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील हे सर्वेक्षण मे.सी.ई. इन्फो सिस्टम्स प्रा. लि. चे भागीदार रिप्लिट इंडिया सोलुशन प्रा.लि. नवी दिल्ली यांच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. त्यांचे अधिकृत प्रतिनिधी (ओळखपत्रासह) तंत्रज्ञानासह सर्वेक्षणासाठी सर्व मालमत्तांना भेट देणार आहेत. या प्रतिनिधीनी विनंती केलेली माहिती आणि संलग्न कागदपत्रे देऊन, तसेच मालमत्तेचे अंतर्गत मोजमाप घेण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात येत आहे. या सर्वेक्षणामुळे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ताधारकांना त्यांच्या मालमत्तेची क्षेत्रफळाच्या अनुषंगाने मालमत्ता कराची आकारणी होत असल्याची खात्री करणे शक्य होणार आहे. भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रात शासनाच्या तसेच महानगरपालिकेच्या विविध योजना त्याचप्रमाणे महत्वकांक्षी प्रकल्प राबवित असतांना भिवंडीकरांचे योगदान आणि सहकार्य कायम लाभले आहे. त्याबदल भिवंडीकरांचे आभार. नागरीकांचे जीवनमान सुकर करण्यासाठी तसेच महापालिकेकडून देण्यात येणाऱ्या सेवा-सुविधांचे प्रभावी नियोजन करण्यासाठी महापालिका प्रशासन सतत प्रयत्नशील आणि कटिबध्द आहे. त्यादृष्टीनेच हे मालमत्ता सर्वेक्षण करण्यात येत आहे.

> **या सर्वेक्षणा दरम्यान मालमत्तेची आणि नागरिकांची सुरक्षितता वास प्रथम प्राधान्य देण्यात येणार आहे त्यामुळे सर्वेक्षणाबाबत नागरिकांच्या काही शंका असल्यास अथवा काही सूचना असल्यास त्या asmtd.bncmc@gmail.com या ई-मेलवर पाठविण्यात याव्यात असे आवाहन करण्यात येत आहे.**
>
> **- बाळकृष्ण क्षिरसागर,उप-आयुक्त (कर)**
> **भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

## वावेघर आदिवासी पाड्यात जीवनावश्यक वस्तूंची मदत

**स्वामी समर्थ केंद्र पारनाका, श्री गणेश भक्ती मंडळ आणि पारनाका शिवजयंती उत्सव समितीचा उपक्रम**



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : स्वामी समर्थ सेवा केंद्र,वावेघर,वाडा,जिल्हा पालघर येथे स्वामी समर्थ केंद्र,पारनाका श्री गणेश भक्ती मंडळ आणि पारनाका शिवजयंती उत्सव यांच्या वतीने स्वामी समर्थ चॅरिटेबल ट्रस्ट साठी, त्या भागातील आदिवासी पाड्यातील लोकांना, जिवनापायोगी वास्तू, अन्न धान्य,कपडे, रोख रक्कम तसेच वापरलेले चांगले कपडे यासाठी लोकांकडे मागणी करून आवाहन केले. तसेच आदिवासी पाड्यातील १२ आदिवासी सामूहिक विवाह साठी आणि त्यानिमित्त येणाऱ्या वऱ्हाड्याना सामूहिक भोजन व्यवस्था साठी लागणारे शिधा सामान,तसेच काही नवीन कपडे यासाठी आवाहन केले होते.

त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून कमी कालावधीत लोकांनी दोन टेम्पो भरून अन्न धान्य,कपडे, महागड्या साड्या देऊ केले. पारनाका गणेश मंदिर समोर हा कार्यक्रम संपन्न झाला. कमलाकर पाटील हे चालवत असलेल्या संस्थेसाठी शिवसेना उप शहरप्रमुख ,शिवजयंती उत्सव संयोजक दिनेश शेटे, राजेश देसाई, अरुण जोशी, संजय शिर्के, शेखर पातकर , कोष्टी, चावरे , तुषार केळकर यांनी मोलाची कामगिरी बजावली. दिनेश शेटे यांच्या पुढाकाराने हब कार्यक्रम संपन्न झाला. इनरव्हील क्लबने १३ तारखेला होणाऱ्या सामूहिक विवाहासाठी वस्तुरुप भरपूर मदत केली.

# देशाला संरक्षित ठेवायचे असेल तर सतर्क राहिले पाहिजे - प्रमोद हिंदुराव

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : देशाची परिस्थिती पुढच्या काळामध्ये सक्षम करायची असेल, देशाला संरक्षित ठेवायचे असेल तर सतर्क राहील पाहिजे. सतर्क राहण्यासाठी सुद्धा पुढचा भविष्याचा वेध घेत असताना आमच्या देशावर कोणी आक्रमण करण्याची हिम्मत करणार नाही असे मत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव यांनी व्यक्त केले. आज असलेल्या मॉकड्रीलच्या पार्श्वभूमीवर हिंदुराव यांनी पत्रकार परिषद घेत केंद्र सरकारच्या या निर्णयाचे स्वागत केले. यावेळी प्रमोद हिंदुराव यांच्यासह माया कटारिया, विनोद भोईर, प्रमोद खरात, रश्मी कोलते, रेखा सोनवणे, भगवान साठे, उदय जाधव आदी पदाधिकारी उपस्थित होते.

केंद्र सरकारच्या गृह खात्याचे अभिनंदन करत 72 नंतर पहिल्यांदाच अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे आणि या देशांमध्ये आपल्या काही भागांमध्ये त्याचा निषेध करत असताना कुठल्याही नागरिकाला या पुढच्या काळामध्ये कुठल्याही त्रास होणार नाही. याची काळजी केंद्र सरकार राज्य सरकार घेतोय आणि कार्यकर्ते म्हणून आम्ही त्यांच्या पाठीशी आहोत. नागरिक संरक्षणाच्या माध्यमातून सतर्क राहण्याचा इशारा प्रत्येकाला दिलेला आहे. भारताच्या संरक्षणासाठी सर्व विद्यार्थ्यांना सैनिकी प्रशिक्षण दिलं पाहिजे असे हिंदुराव यांनी सांगितले.


ठाणे जिल्ह्यामधल्या मुरबाड, शहापूर, कल्याण, भिवंडी या परिसरामधून मुंबईला पाणी जातं. परंतु काही वेळेला आमच्यावर अन्या होतो म्हणून केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या ज्या योजना आहेत त्या योजनेच्या माध्यमातून या पुढच्या काळामध्ये महिलांच्या डोक्यावरील हंडा दूर करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे प्रमोद हिंदुराव यांनी स्पष्ट केले.

## माझ्या वडिलांसह बळी गेलेल्या २८ भारतीयांच्या आत्म्याला शांती मिळाली असेल

### ऑपरेशन सिंदूरवर स्व. संजय लेलेचे पुत्र हर्षदची प्रतिक्रिया

- **ऑपरेशन सिंदूर- भारत ने पहलगामधील अतिरेकी हलल्याचा घेतला बदला.**
- **पाकिस्तानवर २४ मिसाइल , १०० पेक्षा जास्त अतिरेकी मारले गेले**
- **जैंश-लश्कर चे हेडक्कार्टर नेस्तनाभूत**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



डोंबिवली : जम्मू काश्मीर मधील पहलगाम मध्ये 22 एप्रिल रोजी अतिरेकी हल्ल्यात सहा पर्यटक बळी गेले. याचा भारतीय सरकारने बदला घेतला. बुधवारी रात्रीच्या वेळी भारतीय वायू सेनेने पाकिस्तानमधील अतिरेक्यावर जबाबी कारवाई केली. भारतीय वायूसेने पाक अधिकृत कश्मीर एयर स्ट्राइक केली. यात तेथील 7 शहरातील 9 अतिरेकी अड्डुयावर निशाणा साधला. मिळालेल्या माहितीनुसार अनेक अतिरेकी मारले गेले असून वायुसेनेच्या या कामगिरीवर देशवासिय भारत सरकारचे आभार मानत आहे.

पहलगाम मधील अतिरेकी हल्ल्यात बळी गेलेल्या डोंबिवलीतील स्व. संजय लेले यांचा मुलगा हर्षल लेले यांना पत्रकारांनी विचारले असता तो म्हणाला, भारताने अतिरेक्यांच्या ठिकाणावर हल्ला करून त्यांना मारले त्यामुळे माझ्या वडिलांच्या व इतर बळी गेलेल्या 28 जणांच्या आत्म्याला शांती मिळाली असेल. माझी भारत सरकारला विनंती आहे, सर्व अतिरेक्याना मारा. डोंबिवलकरांनी भारतीय वायुसेनेचे आभार मानले.

# रस्ता रुंदीकरण आणि विकासकामांमुळे झाडांची कत्तल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



ठाणे: एकेकाळी शहरात अनेक रस्त्यांवर दुतर्फा दाट झाडांच्या कमानींमुळे पादचारी, वाहनचालकांना कडक उन्हाळाही सुसह्य व्हायचा, पण आता विकासकामांमुळे झाडांबरोबर सावल्याही अदृश्य झाल्या. त्यामुळे सावलीसाठी ठराविक चौकांत हिरव्या आच्छादनांचे मंडप उभे करण्याची पाळी प्रशासनावर आली आहे.

गेल्या काही दिवसांत उन्हाची तीव्रता वाढत असून प्राणीमात्रांना त्याची झळ बसू नये म्हणून महापालिकेने काही उपाययोजना अंमलात आणल्या आहेत. सिग्नल चौकात हिरव्या कापडाचे आच्छादन हा त्यापैकीच एक उपाय. याचा फायदा भर उन्हात हिरव्या सिग्नलची वाट पाहणाऱ्या वाहनचालकांना मोठ्या प्रमाणात होत असला तरी झाडांची जपणूक केली असती तर ही पाळी ठाणेकरांवर आली नसती, असा संताप नागरिक व्यक्त करीत आहेत.

दरम्यान वाढते शहरीकरण, रस्ता रुंदीकरण तसेच सिमेंट काँक्रीटीकरणामुळे ठाणे शहरातील नैसर्गिक हिरवी आच्छादने हरपली आहेत. या विकासकामांमुळे शहरातील रस्त्याच्या दुतर्फा लावलेल्या झाडांची कत्तल करण्यात आली. त्यामुळे रखरखत्या उन्हात प्रवास करणाऱ्या ठाणेकरांना उन्हाचे चटके सहन करावे लागत आहेत. महानगरपालिकेने ६० सेकंदांपेक्षा जास्त वेळ असलेल्या सिग्नल परिसरात कृत्रिम सावलीची व्यवस्था केली आहे. त्यामध्ये तीन हात नाका, आल्मेडा चौक, खोपट, नितीन कंपनी या सिग्नलवर सहा ठिकाणी हिरव्या कापडांचे मंडप उभारले आहेत. त्यामुळे प्रवाशांना काहीसा दिलासा मिळाला आहे. ठाण्यात ६,३६७ झाडे असून त्यामध्ये गुलमोहर, रातराणी, पिंपळ, अशोक, बदाम अशा विविध प्रकारच्या वृक्षांचा समावेश आहे. शहरात अनेक रस्ते बकाल झाले असताना चरई, महापालिका मुख्यालय परिसर, उपवन, मासुंदा तलाव पाळी परिसर, नितीन कंपनी सिग्नल, कॅडबरी सिग्नल, तीन हात नाका सिग्नल परिसरातील सेवा रस्ता, सिव्हिल हॉस्पिटल रोड, जेल रोड, मनिषा नगर, कावेरी सेतू, वसंत विहार अशा अनेक रस्त्यांवर दुतर्फा लावलेल्या झाडांमुळे नागरिकांना गार सावली मिळत असून रस्त्यांनाही शोभा आली आहे.

आगामी काळात उष्णतेचा पारा सातत्याने वाढत जाणार असल्याचे पर्यावरण तज्ञांचे अंदाज आहेत. त्यामुळे बकाल रस्त्यांवर दुतर्फा सावली देणारी झाडे लावावीत, त्यामुळे किमान पुढील पिढीला त्याचा फायदा होईल, अशी मागणी जोर धरू लागली आहे.




# म्हाडाच्या भूखंडावर बेकायदेशीर क्लब

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



ठाणे: वर्तकनगर प्रभाग समिती अंतर्गत ठामपाच्या योजनेंतर्गत अडथळा ठरत असलेला बेकायदेशीर पत्त्यांचा क्लब बंद करून अनधिकृत बांधकाम निष्कासित करावे, अशी मागणी ठाणे जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी केली आहे.

वर्तकनगर हद्दीतील नाक्यावर म्हाडाच्या भूखंडावर एका व्यक्तिने जमिनाचा कब्जा करून मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे केलेली आहेत, त्यातील एका बांधकामामध्ये पत्त्याचा रमी क्लब सुरु असून तो सध्या दोन भावांकडून क्लब भाड्याने चालवला जात आहे. सद्यस्थितीत सदरहू भुखंड हा म्हाडाने ठामपाला हस्तांतरीत केलेला असून त्या भुखंडावर ठामपाने पीपीपी तत्वावर पुनर्बांधणी योजना सुरू केलेली आहे. सदर योजने अंतर्गत विविध प्रकल्पबाधीतांचे पुर्नवसन करण्यात येणार आहे. त्या योजनेच्या अंतर्गत या क्लबचे बांधकाम बाधीत होत आहे. मात्र क्लब चालवणाऱ्या व्यक्ती ह्या राजकीय लोकांशी संबंधित असल्यामुळे क्लबचा वापर करून सदरहू बांधकाम निष्कासित होऊ नये यासाठी महापालिकेच्या अधिकाऱ्यांवर दबाव टाकला जात आहे. स्थानिक पोलिस स्टेशनला वारंवार तक्रार करून सुद्धा हा क्लब बंद केला जात नाही. हा क्लब तातडीने बंद करून हे बांधकाम पुर्णपणे निष्कासीत करणेकरिता ठामपा आयुक्त सौरभ राव ह्यांना निवेदन देण्यात आल्याची माहिती श्री.चव्हाण यांनी दिली. श्री. चव्हाण यांनी सदर ठिकाणी जाऊन ही बाब पत्रकारांच्या निदर्शनास आणून दिल्या. हा क्लब लवकरात लवकर बंद झाला नाही तर धरणे आंदोलन करणार असल्याचा इशारा त्यांनी दिला.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024